जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

0 3 JUL 2026
सकाळ

# 'नॅक' मानांकनाला सहा महिन्यांची मुदतवाढ

## राष्ट्रीय मूल्यांकन व मान्यता परिषदेची मान्यता; पुनर्मूल्यांकनाच्या तयारीला गती मिळणार

■ सकाळ वृत्तसेवा

**कोल्हापूर, ता. २ : शिवाजी विद्यापीठाला राष्ट्रीय मूल्यांकन व मान्यता परिषदेने (नॅक) दिलेल्या प्लस प्लस मानांकनाला सहा महिन्यांची मुदतवाढ मिळाली आहे. त्यामुळे विद्यापीठाला पुढील पाच वर्षांसाठीच्या पुनर्मूल्यांकनाच्या प्रक्रियेला सामोरे जाण्यासाठी आवश्यक तयारी पूर्ण करण्यासाठी अतिरिक्त कालावधी उपलब्ध झाला आहे.**

'नॅक'च्या चौथ्या पुनर्मूल्यांकन फेरीअंतर्गत नॅक पिअर टीमने १५ ते १७ मार्च २०२१ या कालावधीत विद्यापीठाला भेट दिली होती. 'नॅक'च्या बदललेल्या नव्या निकषाअंतर्गत गुणांकन करण्यात आलेले शिवाजी विद्यापीठ हे राज्यातील दुसरे विद्यापीठ होते. त्यामध्ये विद्यापीठाला ३.५२ सीजीपीए गुणांकनासह प्लस प्लस मानांकन मिळाले होते. त्यावेळी नॅक मूल्यांकन प्रक्रियेत अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठातापदाच्या माध्यमातून कुलगुरू डॉ. आर. के. कामत यांनी काम केले होते.

या मानांकनाची मुदत या वर्षीच्या जूनमध्ये संपली. आता 'नॅक'च्या नव्या मूल्यांकन प्रक्रियेनुसार विद्यापीठाला अध्यापनाची गुणवत्ता, संशोधन, नवोपक्रम, विद्यार्थी सुविधा, प्रशासनातील पारदर्शकता, डिजिटल व्यवस्था, हरित उपक्रम, उद्योग-संस्था सहकार्य, सामाजिक उत्तरदायित्व आदी विविध निकषांवर पुन्हा मूल्यमापनाला सामोरे जावे लागणार आहे. मागील सहा महिने कुलगुरू, प्र-कुलगुरू, अधिष्ठाता, आदींचा कार्यभार प्रभारींवर होता. त्यामुळे नव्या निकषांनुसार 'नॅक'ची तयारी करण्यावर काही मर्यादा आल्या. ते लक्षात घेऊन विद्यापीठाने या मानांकनाला मुदतवाढ देण्याची विनंती राष्ट्रीय मूल्यांकन व मान्यता परिषदेला केली होती. या परिषदेने त्याला मान्यता दिली. त्याबाबतचे पत्र आज विद्यापीठाला प्राप्त झाले.

### गुणवत्ता सुधारणा प्रभावीपणे राबविणार

**■ मानांकनाला मुदतवाढ मिळाल्यामुळे विद्यापीठाला गुणवत्ता सुधारणा उपक्रम अधिक प्रभावीपणे राबविण्याची संधी मिळणार आहे. आगामी काळात अधिक चांगले नॅक मानांकन मिळविण्यासाठी प्रशासनाकडून तयारी केली जाईल. विद्यापीठातील विविध विभागांकडून आवश्यक माहिती संकलन आणि दस्तऐवजीकरणाच्या कामाचा वेग वाढविण्यात येणार असल्याचे प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांनी सांगितले.**

### आतापर्यंतचे विद्यापीठाचे नॅक मानांकन



- **२००४- बी-प्लस (७७.७५ सीजीपीए)**
- **२००९- बी (२.८५)**
- **२०१४- ए (३.१६)**
- **२०२१- प्लस प्लस (३.५२)**

> 'नॅक'च्या पुर्नमूल्यांकनात राज्यात अव्वलस्थानी राहण्याच्या दृष्टीने विद्यापीठाकडून सर्वतोपरी तयारी केली जाईल. त्यासाठी विद्यापीठ पातळीवरील आवश्यक तयारी वेगाने केली जाणार आहे.
>
> **-डॉ. आर. के. कामत,** कुलगुरू

0 3 JUL 2026

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कौशल्याधारित अभ्यासक्रमांना पसंती

## विद्यापीठ परिक्षेत्रातील अभ्यासक्रमांची स्थिती : १५ जुलैपर्यंत प्रवेश मुदत, ६५ अभ्यासक्रमांचा सहभाग

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठ परिक्षेत्रात शिकवल्या जाणाऱ्या अभ्यासक्रमांमध्ये कौशल्यावर आधारित त्वरित रोजगार उपलब्ध होणाऱ्या अभ्यासक्रमांकडे विद्यार्थ्यांनी पसंती दिली आहे, तर पारंपरिक अभ्यासक्रमांकडे पाठ फिरवली आहे. ज्या अभ्यासक्रमांना एंट्रन्स आहे त्यांची प्रवेश मुदत ४ जुलै, तर नॉन एंट्रन्स अभ्यासक्रमांना १५ जुलैपर्यंत प्रवेश घेता येणार आहेत.

शिक्षण पद्धतीबरोबरच शिक्षण घेण्याच्या प्रकारातही काळानुसार बदल होत आहेत. पूर्वी उच्च शिक्षण हे प्रमुख विद्याशाखांशी (विज्ञान, कला, वाणिज्य) संलग्न होते. तिथे आता रोजगाराभिमुख, तसेच कौशल्यपूरक अभ्यासक्रमांना मागणी वाढत आहे. शिवाजी विद्यापीठाच्या कॅम्पसमध्ये शिकवल्या जाणाऱ्या अभ्यासक्रमांमध्येही रोजगाराभिमुख अभ्यासक्रमांना पसंती दिली जात आहे, तर पारंपरिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशाची आकडेवारी सिंगल डिजिटमध्ये पोहोचली आहे. परिक्षेत्रात तब्बल ६५ अभ्यासक्रम शिकवले जातात. त्यातील बहुतांश अभ्यासक्रमांची प्रवेश क्षमता ही ४०-५० इतकी आहे. त्यातील कौशल्य अभ्यासक्रमांना ६० टक्क्यांपेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी पसंती दिली आहे, तर पारंपरिक अभ्यासक्रमांना जेमतेम २०-३० टक्केच पसंती असल्याची आकडेवारी समोर येत आहे.

**मागणी असलेले अभ्यासक्रम :** एम.ए. जिओग्राफी, योगाशास्त्र, बॅचलर ऑफ लॅब्ररी, मास्टर ऑफ कॉम्प्युटर ॲप्लिकेशन, मास्टर ऑफ सायन्स, मास्टर ऑफ आर्टस्- हिस्ट्री-इंग्रजी, मास्टर ऑफ कॉमर्स- बँकिंग फायनान्स, मास्टरर-लॉ, फूड टेक्नॉलॉजी, बायोकेमेस्ट्री, बायोलॉजी

**मागणी घटलेले अभ्यासक्रम :** मास्टर आर्टस्, एम.एस्सी. इकॉनॉमिक्स, जर्नालिझम, एम.एस्सी. मॅथेमॅटिक्स पारंपरिक विद्याशाखांचे संलग्न

### तंत्रज्ञानपूरक अभ्यासक्रमांना पसंती

आधुनिक तंत्रज्ञानास अर्थात 'कॉम्प्युटरबेस' अभ्यासक्रमांना विद्यार्थ्यांचा कल जास्त असून, मूलभूत विषयांकडे ओढा कमी झाल्याचे चित्र पाहावयास मिळत आहे. मूलभूत अभ्यासक्रमात फार बदल करता येत नाहीत; पण स्कीलचे कोर्सेस त्याला जोडणे काळाची गरज आहे.

**- आर. व्ही. गुरव,**
अध्यक्ष, केंद्रीय प्रवेश समिती

03 JUL 2026
लोकसत्ता

# पूर व्यवस्थापनात वैज्ञानिक दृष्टिकोन हवा : डॉ. मेरवाडे



**कार्यशाळेत मार्गदर्शन करताना डॉ. वेंकटेश मेरवाडे. सोबत डॉ. सचिन पन्हाळकर, डॉ. प्रकाश राऊत, डॉ. अभिलाष आर., आशिष दोशी.**

**कोल्हापूर :** समाज सुरक्षित ठेवण्यासाठी पूर व्यवस्थापन क्षेत्रात वैज्ञानिक दृष्टिकोन स्वीकारणे आवश्यक आहे. त्यासाठी अचूक पूर मॉडेलिंग, भौगोलिक माहिती प्रणाली, आधुनिक संगणकीय तंत्रज्ञान आणि प्रशिक्षित तज्ज्ञांची आवश्यकता आहे. पूर व्यवस्थापनातील निर्णय प्रक्रिया अधिक परिणामकारक करण्यासाठी एक-आयामी आणि द्वि-आयामी पूर प्रतिमान (मॉडेलिंग) तंत्रज्ञान अत्यंत उपयुक्त ठरत असल्याचे प्रतिपादन अमेरिकेतील पर्ड्यू विद्यापीठातील जलसंपदा व पूर प्रतिमान तज्ज्ञ डॉ. वेंकटेश मेरवाडे यांनी शनिवारी येथे केले.

शिवाजी विद्यापीठात भूगोल अधिविभाग, सेंटर फॉर क्लायमॅट चेंज अँड सस्टेनॅबिलीटी स्टडीज आणि ॲक्वास्फिअर क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित पूर व्यवस्थापन व पूर मॉडेलिंग विषयावरील कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. मानव्यशास्त्र सभागृहात झालेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ पर्यावरण तज्ज्ञ डॉ. प्रकाश राऊत होते.

डॉ. मेरवाडे म्हणाले, पूर कोणालाही अपेक्षित नसला तरी तो वास्तव आहे. त्यामुळे अशा आपत्तींचा अभ्यास करून त्यासाठी सक्षम नियोजन करणे ही काळाची गरज आहे. अध्यक्षीय मनोगतात पर्यावरण विभागाचे निवृत्त प्रमुख डॉ. प्रकाश राऊत यांनी कोल्हापूर शहराला दर दोन-तीन वर्षांनी मोठ्या पुरांचा सामना करावा लागत असल्याने पूरपूर्व नियोजनासाठी वैज्ञानिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर आवश्यक असल्याचे सांगितले.

मंचावर बेळगावच्या नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ हायड्रॉलॉजीचे शास्त्रज्ञ डॉ. अभिलाष आर., सिग्मा इन्फ्राप्लॅन इंजिनिअरिंग सर्व्हिसेस प्रा. लि. कंपनीचे आशिष दोशी उपस्थित होते. भूगोल अधिविभागाचे प्रमुख डॉ. सचिन पन्हाळकर यांनी स्वागत केले. प्रशांत पाटील यांनी परिचय करून दिला.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

तरुण भारत

0 3 JUL 2026

## डॉ. वेंकटेश मेरवाडे : शिवाजी विद्यापीठात पूर व्यवस्थापन व पूर मॉडेलिंग कार्यशाळा

# पूर व्यवस्थापनात संशोधनाची गरज

**पूर ही नैसर्गिक आपत्ती असली तरी आधुनिक तंत्रज्ञान, अचूक पूर मॉडेलिंग व प्रशिक्षित तज्ज्ञांच्या माध्यमातून त्याचे परिणामावर उपाय करता येऊ शकतात. पूरापासून होणारी हानी टाळण्यासाठी पूर व्यवस्थापनातील कौशल्य, संशोधन व अत्याधुनिक तंत्रज्ञानाची गरज असल्याचे प्रतिपादन अमेरिकेतील पर्ड्यू विद्यापीठातील जलसंपदा व पूर मॉडेलिंग तज्ज्ञ डॉ. वेंकटेश मेरवाडे यांनी केले.**

त. भा. **प्रतिनिधी**

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात भूगोल अधिविभाग, सेंटर फॉर क्लायमेट चेंज अँड सस्टेनेबिलीटी स्टडीज आणि ॲक्वास्फिअर क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित पूर व्यवस्थापन व पूर मॉडेलिंग विषयावरील कार्यशाळेत ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ पर्यावरण तज्ज्ञ डॉ. प्रकाश राऊत होते.



कोल्हापूर : पूर व्यवस्थापनविषयक कार्यशाळेत मार्गदर्शन करताना डॉ. वेंकटेश मेरवाडे सोबत डॉ. प्रकाश राऊत, डॉ. अभिलाष आर. व आशिष दोशी.


### कोल्हापुरात अनेक घटकांचा अचूक अभ्यास गरजेचा

**डॉ. राऊत यांनी कोल्हापुरला दर दोन–तीन वर्षांनी मोठ्या पुरांचा सामना करावा लागत असून पूर मॉडेलिंगमध्ये भूभागाची उंची, उतार, नदीपासूनचे अंतर, मातीचा प्रकार, जमिनीचा वापर, पर्जन्यमान, जलप्रवाह व नदी जाळे यांसारख्या घटकांचा अचूक अभ्यास महत्त्वाचा असल्याचे सांगितले.**

डॉ. मेरवाडे म्हणाले, राज्यात पावसाअभावी दुष्काळासारखी परिस्थिती निर्माण होण्याची चिंता होती. मात्र, दुसरीकडे अतिवृष्टीमुळे पूरस्थितीही उद्भवू शकते. पूर आपत्तींचा अभ्यास करून त्यासाठी सक्षम नियोजन करणे ही काळाची गरज आहे. पूर व्यवस्थापनासाठी वैज्ञानिक दृष्टिकोन आवश्यक आहे. यासाठी अचूक पूर मॉडेलिंग, भौगोलिक माहिती प्रणाली (जीआयएस), आधुनिक संगणकीय तंत्रज्ञान व प्रशिक्षित तज्ज्ञांची गरज आहे.

प्रशांत पाटील यांनी परिचय करून दिला. डॉ. सचिन पन्हाळकर यांनी स्वागत केले. आशिष दोशी यांनी आभार मानले. यावेळी बेळगावच्या नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ हायड्रॉलॉजीचे शास्त्रज्ञ डॉ. अभिलाष आर., सिग्मा. इन्फ्राप्लॅन इंजिनिअरिंग सर्व्हिसेस प्रा. लि. कंपनीचे आशिष दोशी उपस्थित होते.

0 3 JUL 2026
सकाळ



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात पूर व्यवस्थापनविषयक कार्यशाळेत मार्गदर्शन करताना डॉ. वेंकटेश मेरवाडे. यावेळी डावीकडून डॉ. सचिन पन्हाळकर, प्रकाश राऊत, अभिलाष आर., आशीष दोशी.

# पूर व्यवस्थापनासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर महत्त्वाचा

## डॉ. मेरवाडे : शिवाजी विद्यापीठात कार्यशाळा

कोल्हापूर, ता. २ : समाज सुरक्षित ठेवण्यासाठी पूर व्यवस्थापन क्षेत्रात कौशल्य, संशोधन, अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर महत्त्वाचा आहे, असे प्रतिपादन अमेरिकेतील पर्ड्यू विद्यापीठातील जलसंपदा व पूर मॉडेलिंग तज्ज्ञ डॉ. वेंकटेश मेरवाडे यांनी आज येथे केले.

शिवाजी विद्यापीठात भूगोल अधिविभाग, सेंटर फॉर क्लायमॅट चेंज अँड सस्टेनॅबिलीटी स्टडिज आणि ॲक्वास्फिअर क्लब यांच्यातर्फे झालेल्या पूर व्यवस्थापन व पूर मॉडेलिंग विषयावरील कार्यशाळेच्या उद्‌घाटनप्रसंगी ते बोलत होते. मानव्यशास्त्र सभागृहातील कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ पर्यावरण तज्ज्ञ डॉ. प्रकाश राऊत होते.

डॉ. मेरवाडे म्हणाले, 'पूर व्यवस्थापनात वैज्ञानिक दृष्टिकोन स्वीकारणे आवश्यक असून, त्यासाठी अचूक पूर मॉडेलिंग, भौगोलिक माहिती प्रणाली, आधुनिक संगणकीय तंत्रज्ञान आणि प्रशिक्षित तज्ज्ञांची आवश्यकता आहे, पूर व्यवस्थापनातील निर्णय प्रक्रिया अधिक परिणामकारक करण्यासाठी एक-आयामी, द्वि-आयामी पूर मॉडेलिंग तंत्रज्ञान उपयुक्त ठरत आहे.'

डॉ. राऊत यांनी कोल्हापूरला दर दोन-तीन वर्षांनी मोठ्या पुराचा सामना करावा लागत असल्याने पूरपूर्व नियोजनासाठी वैज्ञानिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर आवश्यक असल्याचे सांगितले. बेळगावच्या नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ हायड्रॉलॉजीचे शास्त्रज्ञ डॉ. अभिलाष आर., सिम्मा इन्फ्राप्लॅन इंजिनिअरिंग सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेडचे आशीष दोशी उपस्थित होते. भूगोल अधिविभागाचे प्रमुख डॉ. सचिन पन्हाळकर यांनी स्वागत केले. प्रशांत पाटील यांनी परिचय करून दिला.

### पूरस्थितीही उद्‌भवू शकते

काही दिवसांपूर्वी राज्यात पावसाअभावी दुष्काळासारखी परिस्थिती निर्माण होण्याची चिंता होती. मात्र, दुसरीकडे अतिवृष्टीमुळे पूरस्थितीही उद्‌भवू शकते. पूर कोणालाही अपेक्षित नसला, तरी तो वास्तव आहे. त्यामुळे अशा आपत्तींचा अभ्यास करून त्यासाठी सक्षम नियोजन करणे ही काळाची गरज असल्याचे डॉ. मेरवाडे यांनी सांगितले.

0 3 JUL 2026

सकाळ

# मोती शेती टाकीच्या डिझाईनला केंद्र सरकारचे पेटंट

## विद्यापीठाच्या 'लॅब टू लँड' संकल्पनेला बळ

कोल्हापूर, ता. २ : शिवाजी विद्यापीठाच्या प्राणीशास्त्र अधिविभागाने विकसित केलेल्या गोड्या पाण्यातील मोती शेतीसाठीच्या अभिनव टाकीच्या डिझाईनला केंद्र सरकारचे पेटंट मिळाले. 'लॅब टू लँड' या संकल्पनेला मूर्त स्वरूप देणाऱ्या या संशोधनामुळे मोती शेतीसाठी आवश्यक नैसर्गिक वातावरण कृत्रिमरीत्या निर्माण करणे शक्य झाले आहे. शेतकऱ्यांसाठी उत्पन्नाचा नवा पर्याय उपलब्ध होणार आहे.

डॉ. नितीन कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली संशोधक साक्षी श्रीकांत ढेकणे, विशाल संभाजी सुतार आणि दिलीप आनंदराव कांबळे यांनी हे संशोधन पूर्ण केले. दोन परस्पर

"समाजोपयोगी उद्योगाभिमुख संशोधनाला शिवाजी विद्यापीठ सातत्याने प्रोत्साहन देत आहे. हे पेटंट 'लॅब टू लँड' संकल्पनेला बळ देणारे असून, संशोधनाचा थेट लाभ शेतकरी आणि उद्योजकांपर्यंत पोहोचविण्याच्या विद्यापीठाच्या ध्येयाला नवी दिशा देणारे आहे.''

**- डॉ. आर. के. कामत**, कुलगुरू

जोडलेल्या टाक्या, जलपरिभ्रमण व्यवस्था, स्प्रिंकलर प्रणाली आणि नियंत्रित पाण्याची गुणवत्ता यामुळे एकदाच भरलेले पाणी तब्बल १५ ते १८ महिने वापरता येते, असे संशोधनातून सिद्ध झाले आहे.

03 JUL 2026
तरुण भारत

# शिवाजी विद्यापीठात वसंतराव नाईक जयंती

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री तथा कृषीक्रांतीचे प्रणेते वसंतराव नाईक यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीत वसंतराव नाईक यांच्या प्रतिमेस कुलगुरू डॉ. राजनीश कामत व प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, आजीवन अध्ययन केंद्राचे डॉ. रामचंद्र पवार, विधी अधिविभागाचे प्रमुख डॉ. विवेक धुपदाळे, डॉ. ज्योतीप्रकाश यादव, संध्या आडसुळे, अनिल साळोखे, उपस्थित होते.

0 3 JUL 2026

सकाळ

# शिवाजी विद्यापीठ येथे वृक्षारोपण कार्यक्रम

कोल्हापूर, ता. २ : सामाजिक वनीकरण विभाग, कोल्हापूर वनपरिक्षेत्र करवीर यांच्यातर्फे शिवाजी विद्यापीठ येथे 'अटल घनवन' उपक्रमांतर्गत वृक्षारोपण कार्यक्रम झाला.

मुख्य वनसंरक्षक श्रीलक्ष्मी ए., जिल्हाधिकारी कोल्हापूर डॉ. विजय राठोड, प्र कुलगुरू ज्योती जाधव, उपवनसंरक्षक कोल्हापूर धैर्यशील पाटील, विभागीय वन अधिकारी किशोरकुमार येळे, कुलसचिव डॉ. शिंदे, वनक्षेत्रपाल करवीर अनिल मोहिते, सहाय्यक वनसंरक्षक (सामाजिक वनीकरण) कोल्हापूर स्नेहल मगर आदी उपस्थित होते. यावेळी मान्यवरांच्या हस्ते विविध देशी वृक्षप्रजातींची लागवड केली. वृक्ष लागवडीनंतर रोपांचे संगोपन व संरक्षण यावर विशेष भर देण्यात येणार आहे.

0 3 JUL 2026
पुढारी

# बी.एस्सी. बी.एड. प्रवेश प्रक्रियेसंदर्भात समुपदेशन सत्रास प्रतिसाद

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या शिक्षणशास्त्र अधिविभागात चार वर्षीय एकात्मिक बी.एस्सी. बी.एड. प्रवेश प्रक्रियेसंदर्भात समुपदेशन सत्रास प्रतिसाद लाभला.

विद्यार्थी, पालकांना प्रवेश प्रक्रियेविषयी अचूक, अद्ययावत माहिती मिळावी, या उद्देशाने ऑनलाईन समुपदेशन सत्राचे आयोजन करण्यात आले. यावेळी शिक्षणशास्त्र अधिविभागाच्या प्रमुख डॉ. चेतना सोनकांबळे यांनी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण अंतर्गत अभ्यासक्रमाची उपयुक्तता भविष्यातील संधी कमवा व शिका योजना, उच्च शिक्षणासाठी उपलब्ध असलेले पर्याय एनएसएस, एनसीसी, स्पोर्टस्च्या विविध संधी याविषयी मार्गदर्शन केले. बी.एस्सी. बी.एड अभ्यासक्रमाच्या समन्वयक डॉ. रूपाली संकपाळ यांनी विद्यार्थ्यांना प्रवेश प्रक्रियेची माहिती दिली.